


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २१२ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.८ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा:बावनकुळे यांचा राहुल गांधींना सल्ला

## जनतेने झिडकारल्यानंतर रडगाणे सुरु झाल्याचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**–२००९ मध्ये ५ महिन्यांत ३० लाख मतदार वाढले तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का? असा प्रश्न उपस्थित करत मतदार वाढीवर प्रश्न विचारणाऱ्या राहुल गांधी यांना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आकड्यांनिशी चोख प्रत्युत्तर दिले आहे. २००९ ला निवडणूक आयोगावर विश्वास होता की तेव्हाही काँग्रेस–आयोग युतीच होती? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. स्वतःचे अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा, असा सल्ला देखील बावनकुळे यांनी दिला आहे.भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आकडेवारी देत राहुल गांधींचे आरोप खोडून काढले आहेत. राहुल गांधी म्हणतात महाराष्ट्रात ५ महिन्यांत ३९ लाख मतदारांची वाढ संशयास्पद आहे. पण राहुलजी २००९ ला काय झालं होतं? तुम्हाला आठवत नसेल तर मी सांगतो. एप्रिल २००९ ला लोकसभा निवडणुकीत – ७ कोटी २९ लाख ५४ हजार मतदार होते तर ऑक्टोबर २००९ ला विधानसभा निवडणुकीत ७ कोटी ५९ लाख ६८ हजार मतदार झाले. तेव्हाही फक्त ५ महिन्यांत ३० लाख मतदार वाढले होते! तेव्हा तुमचा निवडणूक आयोगावर विश्वास होता की तेव्हाही काँग्रेस–आयोग युतीच होती? तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का? याचं उत्तर द्या. २००४, २००९ ला जिंकलात तेव्हा काही प्रश्न पडले नाहीत! आज पराभव झाला, महाराष्ट्रातील जनतेनं तुम्हाला झिडकारलं तेव्हा रडगाणे सुरू झाले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राहुलजी आकड्यांचे अर्धवट वाचन करून देशाला गोंधळात टाकण्याचा निरर्थक प्रयत्न करू नका. स्वतःचे अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा, असा सल्ला देखील त्यांनी दिला आहे. महाराष्ट्रातील जनतेनं तुम्हाला नाकारलं आता बिहारमधील जनताही तुम्हाला हद्दपार करणार आहे. त्याच भीतीतून तुम्ही आतापासून पराभवाचे कारण देत आहात, असा आरोप बावनकुळे यांनी केला आहे.आमच्या महायुतीला महाराष्ट्रातील जनतेने बहुमताने निवडून दिले. जनतेने आमच्यावर दाखविलेला हा विश्वास आहे. तो पुढील निवडणुकीतही असाच अभंग राहील. आपण वारंवार खोटे बोलून राज्यातील जनादेशाचा अपमान करीत आहात. जनता तुम्हाला कधीच माफ करणार नसल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.



# वादळी वाऱ्यांसह अचानक पावसाचा कहर काही भागांत नुकसान, शेतकऱ्यांना दिलासा

**वैजापूर । अर्जुन शिंदे**



दि. ७ जून (शनिवार) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास वैजापूर तालुक्यातील गोळवाडी, दहेगाव, पालखेड, बेंदवाडी, शिवराई तसेच आजूबाजूच्या गावांमध्ये अचानक वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसाला सुरुवात झाली. अवकाळी पावसासोबत विजांच्या कडकडाटाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. या पावसामुळे काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले असून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

वादळ व पावसाच्या तडाख्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, घरावरची पत्रे उडून गेली, तसेच शेतातील बांध फुटल्यामुळे पाणीच पाणी झाले. शेतातील काही ठिकाणी उगवलेल्या पिकांचेही नुकसान झाल्याचे प्राथमिक माहितीवरून समजते. काही भागांत सिंगल फेज डीपी (वीज वितरण व्यवस्था) वादळामुळे जमिनीवर कोसळली असून वीजपुरवठा खंडित झाला आहे.

शिवराई गावात एका शेतकऱ्याच्या घरावरील पत्र्याचे छप्पर उडून गेल्याने घरात पाणी शिरले. गोळवाडी परिसरात झाड पडून एका दुचाकीचे नुकसान झाले. दहेगाव आणि पालखेड भागात शेततळ्यांचे बांध फुटून शेतांमध्ये पाणी घुसल्याचे चित्र दिसले.

या पावसामुळे काही भागांमध्ये नुकसान झाले असले तरी, लवकर सुरू होणाऱ्या मृग नक्षत्राच्या पार्श्वभूमीवर हा पाऊस शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला आहे. उन्हाच्या तीव्रतेनंतर आलेला हा पाऊस शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणणारा ठरला आहे. अनेक शेतकरी आता खरीप हंगामाची तयारी सुरू करत असल्याने या पावसामुळे पेरणीपूर्व मशागत करण्यास मदत झाली आहे.

मात्र काही ठिकाणी वादळी वाऱ्यांमुळे झालेले नुकसान हे आर्थिकदृष्ट्या मोठे असून, नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांनी शासनाकडे त्वरित पंचनामे करून योग्य आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनानेही काही भागांत पाहणी सुरू केली असून, अधिकृत पंचनामे लवकरच सुरू होतील, असे प्राथमिक संकेत मिळाले आहेत.

तालुक्यात अशा प्रकारचा पाऊस अचानकपणे येऊन गेल्याने नागरिक आणि शेतकरी गोंधळात सापडले. येत्या काही दिवसांत हवामानाचा अंदाज पाहता, अशा अनपेक्षित हवामान बदलांमुळे सतर्क राहण्याची गरज असल्याचे मत कृषी विभागाने व्यक्त केले आहे.

### काटोल तालुक्यात आजपासून 'विकसित कृषी संकल्प अभियान'

# शेतकऱ्यांना मिळणार आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष मार्गदर्शन

**काटोल । प्रतिनिधी**

केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या 'विकसित कृषी संकल्प अभियान' अंतर्गत काटोल तालुक्यातील बारा गावांमध्ये दिनांक ८ आणि ९ जून या दोन दिवसांसाठी विशेष कृषी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून देणे, शासकीय योजनांचे प्रत्यक्ष लाभ सांगणे, खरीप हंगामाच्या अनुषंगाने आवश्यक पीक सल्ला मिळवून देणे आणि पशुसंवर्धनासंबंधी वैज्ञानिक मार्गदर्शन करणे हे आहे.या उपक्रमात कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ, विद्यापीठांचे शेती विषयक तज्ज्ञ, केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे अभ्यासक, पशुसंवर्धन विभागातील अधिकारी आणि कृषी विभागाचे अनुभवी मार्गदर्शक थेट शेतकऱ्यांशी संवाद साधून प्रश्नांचे निरसन करणार आहेत. पारडसिंगा, दिग्रस, गोंडीदिग्रस, राऊळगाव, सोनखांब, कोहळा, इसापूर, चंदनपार्डी, मासोद, रिधोरा, धुरखेडा आणि मसाळा या बारा गावांमध्ये हे कार्यक्रम राबवले जात असून प्रत्येक ठिकाणी तांत्रिक मार्गदर्शनाचे स्वतंत्र सत्र आयोजित केले आहे.

शेतीतील नवतंत्र, पीक निवड, बियाणांची गुणवत्ता, सेंद्रिय शेतीचे फायदे, जल व्यवस्थापन, मृद आरोग्य तपासणी, पाणी टंचाईतील उपाय, आणि नैसर्गिक आपत्तीतील शासनाच्या मदतीबाबतही माहिती दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री पीक विमा योजना, कृषी सिंचन योजना, आत्मा योजना, पशुधन विकास योजना यांसारख्या विविध शासकीय योजनांविषयीचे सविस्तर मार्गदर्शन या उपक्रमात दिले जाणार आहे.या अभियानामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला थेट शास्त्रज्ञांशी संवाद साधता येणार असून स्थानिक पातळीवरील अडचणींवरही योग्य उपाय मिळणार आहेत. कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मार्गदर्शनासोबत प्रत्यक्ष प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात येणार आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा समन्वय साधता येईल.काटोल तालुका कृषी अधिकारी यांच्या वतीने शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा आणि शेतीच्या नव्या युगात आत्मनिर्भर होण्यासाठी पाऊल उचलावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून उत्पादन वाढीस चालना मिळेल, बाजारपेठांपर्यंत पोहोच सोपी होईल आणि शेतीतून मिळणारे उत्पन्नही निश्चितच वाढेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# चढावर उलटलेल्या ट्रॅक्टरने घेतला युवकाचा बळी

## अवैध रेती वाहतुकीवर पुन्हा प्रश्नचिन्ह



**वारोरा । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील तुळाणा घाट येथे अवैध रेती भरलेला ट्रॅक्टर चढ चढताना अचानक उलटला. या अपघातात चालक आशिष बोडे (वय २५) याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे अवैध रेती वाहतुकीच्या वाढत्या प्रमाणावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

घटनास्थळी मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी ७ जून रोजी सकाळी रेती घेऊन जात असलेला ट्रॅक्टर तुळाणा घाट चढत असताना अनियंत्रित होऊन पलटी झाला. ट्रॅक्टरखाली दबून गंभीर जखमी झालेल्या आशिष बोडे याला तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, रेती तस्करीमुळे युवकांचे बळी जाण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने स्थानिक पातळीवर संताप व्यक्त केला जात आहे.

# कैद्यांच्या फराळात ५ कोटींचा घोटाळा : राजू शेट्टी यांचा जालिंदर सुपेकर अन् अमिताभ गुप्ता यांच्यावर गंभीर आरोप

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**–वैष्णवी हगवणे आत्महत्येप्रकरणी नाव समोर आल्यानंतर रडारवर आलेले जालिंदर सुपेकर यांच्या कारनाम्यांची मालिका थांबायचे नाव घेत नाहीये. कोटींच्या भ्रष्टाचाराच्या चर्चेत अडकलेल्या सुपेकरांवर आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत.

शेट्टींनी समाजमाध्यमांतून मोठा गौप्यस्फोट करत सांगितलं की, सुपेकर आणि तत्कालीन पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी मिळून कैद्यांच्या दिवाळी फराळाच्या नावाखाली तब्बल १,२०० रुपये किलोची काजूकतली खरेदी केली, मात्र ती कैद्यांना मिळाल्याचे कुठेही दिसून आले नाही. प्रत्यक्षात कैद्यांना स्थानिक बाजारातील स्वस्त फराळ पुरवण्यात आला आणि दरांमध्ये ४० ते ६० टक्क्यांची मोठी तफावत होती, असा आरोप त्यांनी केला.

राज्यातील विविध कारागृहांतील रेशन व कॅन्टीन खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असून, गेल्या दिवाळीत सुमारे ५ कोटी रुपयांची खरेदी केल्याचं शेट्टी यांनी नमूद केलं. या खरेदीसाठी कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता थेट साहित्य खरेदी केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काजूकतली हल्दीराम, चितळे बंधू वा काका हलवाई दराने खरेदी दाखवून स्थानिक फराळ देण्यात आला. हे स्पष्ट भ्रष्टाचार आहे, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिलं आहे.

राजू शेट्टी म्हणाले की, दिवाळी फराळ म्हणून कैद्यांना अमिताभ गुप्ता व जालिंदर सुपेकर यांनी १२०० रूपये किलोची काजूकतली खायला घातली मात्र कैद्यांनी ती खाल्लीच नाही ! राज्यातील कारागृहात कैद्यांच्या नावाखाली बड्या अधिकाऱ्यांनी रेशन व कॅन्टीन साहित्य खरेदीमध्ये प्रचंड मोठा भ्रष्टाचार केला आहे. कारागृह विशेष पोलिस महानिरीक्षक यांनी कैद्यांना दिवाळीमध्ये जे फराळाचे साहित्य दिले त्या फराळाच्या साहित्याचे दर हल्दीराम



,काका हलवाई व चितळे बंधू यांच्या दर पत्रकाप्रमाणे होते. प्रत्यक्षात कैद्यांना लोकल मार्केटमधील फराळ खरेदी करून देण्यात आला या दरामध्ये जवळपास ४० ते ६० टक्के तफावत होती. गत दिवाळीत राज्यामध्ये जवळपास ५ कोटी रूपयाची खरेदी करण्यात आली आहे. सदरची खरेदी करण्यासाठी कोणतीही निवीदा प्रक्रिया करण्यात आली नाही. सोबत फराळाचे साहित्य व त्याचे दरपत्रक टाकले आहे यावरून कारागृहात किती अनागोंदी कारभार चाललेला आहे हे लक्षात येईल.पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर चर्चेत आलेले वरीष्ठ पोलिस अधिकारी जालिंदर सुपेकर यांच्या भ्रष्टाचार आणि पैसे हडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. जालिंदर सुपेकर यांनी अमरावती तुरंगात असलेल्या कैद्यांकडून जामीन मिळवून देण्याच्या मोबदल्यात ५५० कोटी रुपये मागितल्याचा आरोप ड. निवृत्ती कराड यांनी केला आहे. तसेच गायकवाड यांचे बँक लॉकर्स, सोनं आणि रोख रक्कम जप्त करताना सुपेकर आणि पुण्याचे तत्कालीन पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी १०० ते १५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप देखील ड.कराड यांनी केला आहे.

# वाटोळे करणाऱ्याच्या हाती मुंबई मनपा जाणार नाही शिवसेना–भाजपच्या ताब्यात राहील–संजय शिरसाट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना– भाजपच्या ताब्यात राहील आणि आमचा भगवा तिथे फडकेल, असे शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले आहे. तर मुंबईचे वाटोळे करणाऱ्याच्या हाती आता मुंबई राहणार नाही. उबाठावाल्याचे आपली मुंबई आता गुजरातमध्ये जाणार महाराष्ट्रापासून तुटणार हे वाक्य अजून बाकी असल्याचा टोलाही त्यांनी यावेळी लगावला आहे.भाजप शिंदेसेनेत मुंबई मनपात मोठा भाऊ कोण, अशी चर्चा सुरू झाली आहे. याबाबत शिरसाट म्हणाले की, निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष सर्व्हेचा अहवाल आणतात. विधानसभेला ८० टक्के सर्व्हे चुकीचे निघाले. त्यामुळे मुंबई महापालिकेत कोण छोटा भाऊ आणि कोण मोठा भाऊ अजून ठरलेले नाही.

संजय शिरसाट म्हणाले की, येत्या सोमवारपासून जे काही मोठे कार्यकर्ते आहेत, अनेक चांगले पदाधिकारी हे उबाठाच्या कार्यपद्धतील कंटाळले आहेत तिथे त्यांना विचारले जात नाही, असे अनेकि लोक आहेत ते शिवसेनेमध्ये प्रवेश करत आहेत. आमचे टायगर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हे प्रवेश सुरू आहेत. आमची ही प्रकिया जोमात सुरू होणार आहे.संजय शिरसाट म्हणाले की, सामनामध्ये जे लिहले आहे त्याच्याअगदी उलटे होत असते. सामनामध्ये बोलणारा आणि लिहणारा याचे मागे अडीच वर्षामध्ये जे काही भाकिते केली अन् ती खरे ठरली असे दिसले का? म्हणून शुभबोलरे नाऱ्या असे म्हणावे लागेल.संजय शिरसाट म्हणाले की, मुंबईचा कसला लढा आला? बरं झाले आणखीन त्यांनी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होणार नाही हा सुर आवळला नाही. आपली मुंबई आता गुजरातमध्ये जाणार महाराष्ट्रापासून तुटणार हे वाक्य अजून बाकी आहे. मुंबईचे वाटोळे करणाऱ्याच्या हाती आता मुंबई राहणार नाही तर शिवसेना– भाजपच्या ताब्यात राहील आणि आमचा भगवा तिथे फडकेल.काल माध्यमांशी बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येणार नाही. ही केवळ शक्यता आहे. सर्व्हेमधून अशा चर्चा पुढे येतात, पण या गोष्टी घडतीलच असे गृहित धरू नये. आपण कोणासोबत आहोत किंवा नाही, हे पक्ष ठरवेलच. मात्र, आपला भगवा मुंबई महापालिकेवर फडकला पाहिजे, हा आमचा स्पष्ट विश्वास आहे.

# साक्री ग्रामीण रुग्णालयात घाणीचं साम्राज्य दुर्गंधीमुळे रुग्ण आणि नातेवाइकांचे हाल

## उपसरपंच नामदेव टकले यांचा प्रशासनावर संताप; शौचालयातील व्हिडिओ व्हायरल

**धुळे । उमाकांत अहिरराव**

तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या साक्री ग्रामीण रुग्णालयात सध्या घाणीचं साम्राज्य पसरलं असून, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. ठिकठिकाणी पडलेला कचरा, दुर्गंधीयुक्त शौचालयं, नाल्यांची दुरवस्था आणि डुकरांचा वावर या सर्व समस्यांमुळे रुग्णालयाची अवस्था अत्यंत चिंताजनक झाली आहे.रुग्णालय परिसरात वाया गेलेलं अन्न, रिकाम्या बाटल्या, सिगारेट आणि गुटख्याच्या पुड्यांचे ढिग साचले असून, परिसरात दुर्गंधीने नाकावर रुमाल धरावा लागतो. मागील बाजूस तर इतकी घाण आहे की, तेथे काही क्षण उभं राहणंही कठीण होतं आहे. स्वच्छतागृहांची स्थिती तर अत्यंत दयनीय असून, तिथे जातानाही भीती वाटावी अशी परिस्थिती आहे. या संदर्भात दिघावे येथील उपसरपंच नामदेव टकले यांनी आवाज उठवला असून, स्वतः एका रुग्णासोबत रुग्णालयात गेले असताना त्यांनी पाहिलेल्या अस्वच्छतेचा व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रीत करून पत्रकारांकडे पाठवला. प्रत्येक दिवशी तालुक्यातील कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने रुग्ण येथे उपचारासाठी येतात. मात्र स्वच्छतेकडे पुरेसे लक्ष न दिल्याने या ठिकाणी आरोग्य सेवा धोक्यात आली आहे. ग्रामीण भागातील अनेकांना हे रुग्णालय एकमेव पर्याय असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.सध्या साक्री ग्रामीण रुग्णालयाची अवस्था पाहता, तत्काळ स्वच्छता मोहिम हाती घेऊन परिसराची स्वच्छता, शौचालयांची दुरुस्ती आणि कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिक आणि स्थानिक प्रतिनिधींनी केली आहे.








रुग्ण आणि नातेवाइकांना



उपचारासाठी येताना जीव मुठीत धरावा लागतो. दुर्गंधी, अस्वच्छता आणि प्रशासनाचे दुर्लक्ष या तिन्हींच्या त्रासात रुग्ण फसले आहेत. रुग्णालय प्रशासन झोपले आहे आणि लोकप्रतिनिधी ही याकडे दुर्लक्ष करत आहेत.

–उपसरपंच नामदेव टकले


# डरपोक सहकार महर्षी आणि लोकशाहीची गळचेपी

**महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र हे केवळ आर्थिक प्रगतीचे साधन नव्हते, तर ते ग्रामीण भागातील लोकशाही नेतृत्व तयार करणारे एक सामाजिक विद्यापीठ होते. परंतु आज याच सहकार क्षेत्राचा आत्मा छिन्नविछिन्न होतोय, मूल्ये पायदळी तुडवली जातायत आणि सत्तेच्या हव्यासात काही ठराविक मंडळी सत्तेच्या खुर्चीला चिकटून राहण्यासाठी असंविधानिक मार्गांचा अवलंब करत आहेत. हे दृश्य केवळ लज्जास्पद नाही, तर गंभीरपणे धोकादायक आहे.याचं ताजं उदाहरण म्हणजे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक प्रक्रिया एक अशी निवडणूक जिथे लोकशाही आहे, पण तिची शुद्ध हत्या आधीच करण्यात आलेली आहे. लेखा परीक्षणाच्या आधारावर 'अ', 'ब' आणि 'क' अशा तीन श्रेणींमध्ये सहकारी संस्थांचं वर्गीकरण करण्यात आलं. या वर्गीकरणातून 'क' श्रेणीतील संस्थांना फक्त मतदानाचा हक्क देण्यात आला, परंतु निवडणूक लढण्याचा अधिकार हिरावून घेतला गेला.**

सत्ताधाऱ्यांनी यासाठी 'अंकेक्षण गुणपत्रक' हा पडदा उभा केला पण पडद्याआडची भीती मात्र साफसाफ दिसून येते. ती भीती आहे निवडणूक लढवण्याची, ती भीती आहे प्रश्नांना सामोरे जाण्याची, आणि ती भीती आहे लोकांनी दिलेला निकाल स्वीकारण्याची. ही केवळ राजकीय भिती नाही, तर ती लोकशाही व्यवस्थेवरचा अविश्वास आहे.

'क' वर्गातील सहकारी संस्था म्हणजे विविध शेतकरी सेवा संस्था, लघु सहकारी संस्था, पतसंस्था या संस्था ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. या संस्थांचे प्रतिनिधी हे जमिनीवरचे नेतृत्व करणारे लोक असतात, जे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणारे, भागीदारीच्या तत्त्वावर काम करणारे आणि संस्थांचे खरीखुरी प्रतिनिधित्व करणारे असतात. अशा प्रतिनिधींना निवडणूक लढवण्यापासून रोखणे म्हणजे लोकशाही प्रक्रियेलाच कात्री लावणं नाही का? ही निवडणूक बिनविरोध करायची, पण मतदारांवर दबाव, नियमांचे विकृत अर्थ लावून, विरोधकांना प्रक्रिया बाहेर ढकलून. ही निवडणूक न खेळता जिंकायचा केविलवाणा प्रयत्न आहे. आणि जे हे करतात, ते स्वतःला 'सहकार महर्षी', 'सेवक' वगैरे म्हणवून घेतात. वास्तविकतेत हे लोक सहकाराच्या मंदिरात बसलेले दरबारी राजे झाले आहेत, जे आपल्या खुर्चीसाठी आणि सत्तेसाठी कोणत्याही सीमा ओलांडू शकतात. मागे एकदा नोकरभरतीच्या वेळीच चंद्रपूर बँकेचे प्रकरण चर्चेत आले होते. आरक्षण पायदळी तुडवले गेले, आर्थिक निकषांवर पांघरूण घातले गेले आणि अखेर एसआयटी चौकशीची वेळ आली. हीच मंडळी आता पुन्हा सत्तेवर येण्यासाठी 'क' वर्गीय संस्थांना तांत्रिक कारणावरून अपात्र ठरवत आहेत. यातून एकच गोष्ट स्पष्ट होते सत्ता टिकवण्यासाठी ही मंडळी काहीही करू शकतात. या सगळ्याचं अंतिम लक्ष्य काय आहे? बिनविरोध निवडून येणं. आणि का? कारण निवडणुकीत पराभवाची भीती आहे, विरोधकांच्या प्रश्नांची भीती आहे, आणि निवडून आल्यावर उत्तरदायित्व स्वीकारावं लागेल, याची भीती आहे. म्हणूनच ही मंडळी आपापसांतच निवडून येतात, ठरावही स्वतःच करतात, आणि विरोधकांची पात्रताच संपवतात. सहकार म्हणजे सहभाग, सहकार म्हणजे समान संधी, सहकार म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालवलेली आर्थिक, सामाजिक संस्था. पण जेव्हा निवडणूक लढवण्याचे दरवाजे केवळ विशिष्ट गटासाठी खुले ठेवले जातात, तेव्हा सहकार संपतो आणि सत्ता हेच अंतिम लक्ष्य उरतं. हे सर्व पाहता असा प्रश्न उपस्थित होतो की, या संस्थांचं पुढचं भविष्य काय? शेतकरी, शेतमजूर, महिलांचे गट, सामाजिक कार्यकर्ते यांचा सहकाराच्या प्रक्रियेतील सहभाग असाच खुंटवला जाणार का? की ग्रामीण महाराष्ट्राच्या जनतेला या प्रकारांचा उघडपणे प्रतिकार करावा लागणार? या मुद्द्यावर 'क' वर्ग संस्थांचे प्रतिनिधी जे वक्तव्य करतायत, ते सडेतोड आणि प्रगल्भ आहे ज्यांना निवडणुकीची भीती वाटते, त्यांनी सत्ता सांभाळण्याचे स्वप्नही पाहू नये.ही केवळ प्रतिक्रिया नाही, ही लोकशाही मूल्यांवर असलेली निष्ठा आहे. महाराष्ट्राने सहकार चळवळीच्या नावावर अनेकदा अभिमान बाळगला आहे. पण आज या चळवळीला नव्याने जागं करण्याची गरज आहे केवळ घोषणा करून नव्हे, तर लोकशाही मूल्यांसाठी लढा देऊन. 'बिनविरोध' निवडणुका सहकार क्षेत्राची शोकांतिका ठरत असतील, तर त्या विरोधात आवाज उठवणं हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

सत्ता हवीच असेल, तर ती लोकांनी निवडून दिलेल्या प्रामाणिक मार्गाने मिळवावी. निवडणूक म्हणजे युद्ध नाही, ती विश्वासाची परीक्षा असते. पण जिथे निवडणुकीचीच भीती वाटते, तिथे सत्ता मिळालीच तरी ती केवळ आत्मविश्वासशून्य सत्तेचं चित्र दाखवते आणि अशा दरबारी सहकार महर्ष्यांनी लोकशाहीच्या मंदिरात स्थान मिळणं हे या व्यवस्थेचं दुर्दैव ठरतं.



संपादक
आशिष घुमे
e sahyandrinews@gmail.com

# सदगुरु जगन्नाथ महाराज निघाले विठुरायाच्या भेटीला

## मारेगावात भव्य स्वागत,भाविकांची पालखी दर्शनाला रिघ



**यवतमाळ । प्रतिनिधी**

सदगुरु जगन्नाथ बाबाची पालखी विठु रायाच्या दर्शनास भागवत एकादशी ता.३ जुन रोजी नंदेश्वर देवस्थान वणी येथुन विठु माउलीचा गजर करीत ढोल ताशाच्या निनादत पायदळ वारकऱ्यांसह पंढरपूरसाठी निघाली असुन मारेगावात पालखीचे आगमण होताच पालखी सोहळा डोळ्यात साठवून घेण्यासाठी व दर्शनास भाविकांचा मेळा जमला होता. दरवर्षी विठोबा माऊलीच्या भेटीला सदगुरु जगन्नाथ बाबांची पालखी भाविक भक्त पायदळ वारी पंढरपुरला जात असतात. ता.३ जुन पासुन निघालेला जगन्नाथ बाबा पालखी सोहळा देवशयनी आषाढी एकादशीला अर्थात तब्बल एक महिन्यानंतर पंढरीनाथाच्या पंढरीत पोहचेल.

दरम्यान ता. ३ जुन रोजी सायंकाळी सद्गुरु जगन्नाथ बाबांची पालखी ढोल ताशा तथा वारकरी भजनाच्या विठुरायाचा गजर करीत मारेगावात पोहचताच ठीकठीकाणी पालखिचे स्वागत करण्यात आले. गणेश गुंडावार यांच्या प्रतिष्ठान समोर त्यांनी चहा पाणी व्यवथा केली होती. वसाहत प्रारंभ होताच प्रभाग क्रमांक पाच येथिल नगरसेविका वर्षा किंगरे आणि एकविरा दुर्गा उत्सव महिला मंडळ यांनी वारकऱ्यांचे चरण जलभिषेक करून औक्षवन करून आशिर्वाद घेवुन पालखीचे पुजन व दर्शन घेत विश्राम स्थळापर्यंत वारीत सहभाग नोंदविला.मार्डी चौकात पालखीचे आगमन होताच, वणी विधान सभाक्षेत्राचे आमदार संजय देरकर यांनी पालखीचे दर्शन घेतले. यावेळी नगराध्यक्ष मनिष मस्की, माजी जि.प.सदस्य अनिल देरकर, करन किंगरे उपस्थित होते. मारेगावकरांसह ग्रामिण भागातील भाविकांनी पालखी दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. सायंकाळी आठ वाजेदरम्यान पालखीचे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात आगमन झाले. रिंगन करुन वारकरी दिंडीचे विलोभनीय दृष्य तालुक्यातील भाविकांनी डोळ्यात साठवले. पालखी सोहळ्यात सहभागी हजारो भाविकांच्या रात्री होणाऱ्या विसाव्याची व महाप्रसादाची व्यवस्था माजी जि.प. सदस्य अनिल देरकर तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक बंडु पाटील खडसे यांनी सांभाळली. तर यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती गौरीशंकर खुराणा तथा संचालक मंडळानी सहकार्य केले.

# वृक्षसंवर्धनाने पर्यावरणाचा समतोल राहतो–सुनिल सकट



**पाथर्डी । वजीर शेख**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर येथील लालटाकी परिसरात वृक्षारोपण उपक्रम आयोजित करण्यात आला. पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवावा आणि भविष्यासाठी हरित वारसा जपावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख व समाजसेवक सुनिल सकट यांनी स्वतः पुढाकार घेतला.

यावेळी सकट यांनी सांगितले की, वृक्षसंवर्धन हे केवळ एक दिवसापुरतं मर्यादित नसून, ते सतत चालणारी सामाजिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, आणि मानवसह सर्व सजीव सृष्टीसाठी आवश्यक असलेल्या प्राणवायूची निर्मिती नियमित व्हावी, यासाठी वृक्षारोपण अत्यावश्यक आहे.

कार्यक्रमात संतोष शिरसाट व सुनिल सकट यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी विनोद शिरसाट, अनिल वाघमारे, अंजना शिरसाट, मल्हार कुचेकर, सचिन शिरसाट, दीपक आव्हाड, गौरी शिरसाट, अनिल शेलार, कुणाल शिरसाट, विनायक शिरसाट आदी पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनिल सकट यांनी पुढाकार घेतला असून, लागवड केलेल्या वृक्षांचे संवर्धन आणि निगा राखण्याची जबाबदारी संतोष शिरसाट यांनी स्वीकारली. परिसरातील नागरिकांनीही या प्रयत्नाचे स्वागत केले असून, भविष्यात असे उपक्रम अधिक ठिकाणी राबवले जातील, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली.

# वादळी वाऱ्याने सोलर यंत्रणा उडाल्या; शेतकऱ्यांचे नुकसान

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यात शनिवारी (दि. ७ जून) दुपारी तीनच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने हाहाकार माजवला. विजांच्या कडकडाटासह आलेल्या पावसामुळे अनेक भागात शेतीपूरक यंत्रणा व पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील परसोडा, शिवराई, बेंदवाडी, दहेगाव, पालखेड या गावांमध्ये वादळी वाऱ्याचा तडाखा बसला. यात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील संरचना उध्वस्त झाल्या असून, शेतीशी संबंधित साहित्याचाही अपार नुकसानीचा फटका बसला आहे.



गोळवाडी येथील संताराम भिका पगार यांच्या शेतातील (गट क्र. १५/१) सोलर पंपाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या शेतात रवींद्र सोलर लुबी कंपनीचे सोलर यंत्र बसवण्यात आले होते. मात्र वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे ही संपूर्ण यंत्रणा जमिनीवर कोसळली. या घटनेत यंत्राचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, संबंधित शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.वादळी वाऱ्यामुळे फक्त सोलरच नव्हे, तर झाडे, पत्रे, शेड आणि इतर पायाभूत सुविधा देखील उध्वस्त झाल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी शेती पिकांचेही नुकसान झाल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सरकारने लवकरात लवकर पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत जाहीर करावी.तसेच सोलर पंप आणि इतर यंत्रणांचे नुकसान हे विमा किंवा अनुदानाच्या माध्यमातून भरून काढले जावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान भरून निघणे कठीण होईल, असा इशारा देखील काही शेतकरी संघटनांनी दिला आहे.

# संजीवन पर्यावरण संस्थेचा आधारस्तंभ पुढील सेवेसाठी सज्ज

**मूल । प्रतिनिधी**

संजीवन पर्यावरण संस्थेचे सक्रिय सचिव व कार्यसमर्पित सदस्य मनोज रणदिवे यांची बदली महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमध्ये कनिष्ठ अभियंता पदावरून कल्याण (मुंबई) येथे झाली असून, त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी संस्थेच्या वतीने दि. ७ जून २०२५ रोजी मूल येथील इको पार्क मध्ये भावनिक आणि आत्मीयतेने भरलेला निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.मनोज रणदिवे हे संस्थेच्या स्थापनेपासूनच पर्यावरण रक्षण, वृक्ष संवर्धन, जनजागृती, सायकल मोहिमा, जलसंवर्धन, प्लास्टिक निर्मूलन यासारख्या उपक्रमात अग्रभागी राहिले.



संकटसमयी तत्पर धाव घेणारा, प्रत्येक उपक्रमात निःस्वार्थपणे योगदान देणारा कार्यकर्ता म्हणून त्यांनी संस्था आणि मूल परिसरात एक विशिष्ट ओळख निर्माण केली आहे.या कार्यक्रमाला अध्यक्ष उमेशसिंह झिरे, उपाध्यक्ष प्रशांत मुत्यारपवार, डॉ. संदीप छौनकर, पंकज उजवणे, प्रशांत केदार, दिनेश खेवले, विशाल आक्केवार, स्वप्नील आक्केवार, रुपेश खोब्रागडे, अंकुश वाणी, तन्मयसिंह झिरे, संकल्प गणवीर, हर्षल वाकडे, हौशिक मंगर, आदित्य दहीवले, मनिष मोहबंशी, तरुण उपाध्ये, अक्षय दुम्मावार, तन्मय उराडे यांच्यासह संस्थेचे अनेक सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमात संस्थेच्या सदस्यांनी मनोजभाऊंच्या कार्याचा गौरव करत त्यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. मनोजभाऊ हे केवळ सचिव नव्हते, तर आमच्यासाठी ऊर्जा, प्रेरणा आणि सदैव पुढे चालण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व होते, असे गौरवोद्गार अनेकांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सदस्यांनी मनोजभाऊंना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत, संस्थेतील त्यांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांना भावनिक निरोप दिला. पर्यावरणासाठी समर्पित असलेला हा आधारस्तंभ आता कल्याण येथे आपल्या सेवेस सज्ज झाला आहे.

# रोहा नगरीत शिवसृष्टीचे भव्य लोकार्पण
# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त ऐतिहासिक सोहळा

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

शिवछत्रपतींच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यातील रोहा नगरीत इतिहास घडला. ६ जून २०२५ रोजी सायंकाळी ७.३० वाजता, रोहा-अष्टमी नगरपरिषद हद्दीतील कुंडलिका नदी संवर्धन गार्डन येथे रायगड जिल्ह्यातील पहिल्या 'शिवसृष्टी'चा लोकार्पण सोहळा दिमाखात पार पडला.खासदार सुनील तटकरे, कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते या ऐतिहासिक शिवसृष्टीचे उद्घाटन करण्यात आले. सोहळ्याला हजारो शिवभक्त मोठ्या भक्तिभावाने उपस्थित राहिले होते. उद्घाटनाच्या क्षणी 'राज्याभिषेक सोहळ्याच्या' पार्श्वभूमीवर गाजणारी 'जय भवानी, जय शिवाजी'ची गर्जना साऱ्या रोहा नगरीत घुमत होती.

या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन अत्यंत भव्य स्वरूपात करण्यात आले होते. रोहावासीयांना इतिहास, संस्कृती व अभिमान यांचा संगम प्रत्यक्षात अनुभवायला मिळाला. 'शिवसृष्टी' या संकल्पनेतून शिवरायांचा जीवनप्रवास, त्यांच्या शौर्यगाथा, युद्धनीती आणि स्वराज्य स्थापनेचा प्रेरणादायी इतिहास कलात्मक पद्धतीने उभा करण्यात आला आहे.कार्यक्रमाला सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक आणि महायुतीचे प्रमुख श्री रोशन चाफेकर, वैभव कुलकर्णी, रिया कासार, परेश चितळकर यांच्यासह प्रतिष्ठानचे अनेक सदस्य उपस्थित होते. त्यांच्याच पुढाकारातून हा महत्त्वाकांक्षी उपक्रम साकारला गेला आहे.शिवसृष्टीच्या उद्घाटनानंतर स्थानिक नागरिक आणि शिवप्रेमींनी या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले. रोहा शहरात असे शिवप्रेरित स्मारक उभारले गेले असल्याने स्थानिक तरुणाईसहीत संपूर्ण जिल्ह्यातील जनतेत अभिमानाचे व सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.कार्यक्रमाचे नियोजन, स्वच्छता, सुरक्षा, तसेच संस्कृतीच्या उलगडणाऱ्या प्रस्तुतीमुळे उपस्थित शिवभक्त भारावून गेले होते. ही शिवसृष्टी रोहा शहरातील नागरिकांसाठी अभिमानाचे आणि प्रेरणेचे केंद्र ठरणार आहे, याबाबत कोणतीही शंका नाही.



# बदलापूरमध्ये छत्रपती शिवरायांच्या भव्य स्मारकाचा लोकार्पण सोहळा थाटात पार

## भोसले घराण्याचे वंशज मालोजीराजे भोसले यांच्या उपस्थितीत स्मारकाचा जिर्णोद्धार पूर्ण; हजारो शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

**दलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत, बदलापूर शहरात बसस्थानक शेजारी असलेल्या शिवस्मारकाचा जिर्णोद्धार व लोकार्पण सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडला. या सोहळ्यास भोसले घराण्याचे व अक्कलकोट संस्थानाचे वंशज राजे श्रीमंत मालोजीराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीने ऐतिहासिक भारदस्तपणा लाभला.



या स्मारकाच्या जिर्णोद्धाराचे कार्य शिवभक्त राजेंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि अथक प्रयत्नांतून पूर्णत्वास गेले. त्यांनी स्मारकाच्या जपणुकीसाठी घेतलेली जबाबदारी आणि त्या मागील शिवप्रेम याची उपस्थितांनी विशेष दखल घेतली. मालोजीराजे भोसले यांनी या स्मारकास रायगडाच्या प्रतिरूपाची उपमा देत विशेष कौतुक केले.

शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने परिसरात भगव्यांचा समुद्र उसळला होता. हजारोंच्या संख्येने जमलेले शिवभक्त छत्रपती शिवाजी महाराज की जय ! च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या झेंड्यांच्या लाटांमध्ये हा सोहळा अतीव उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास आमदार किसन कथोरे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, तसेच अनेक मान्यवर पदाधिकारी, शिवप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजेंद्र चव्हाण यांच्या शिवप्रेमातून उभा राहिलेला हा स्मारकप्रकल्प आता बदलापूरकरांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# एक पेड माँ के नाम : पर्यावरणासाठी पुणे-सातारा रोड प्रायव्हेट लिमिटेडचा हृदयस्पर्शी उपक्रम

**पाटस । योगेश राऊत**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक अर्थपूर्ण आणि भावनिक आवाहन करणारा उपक्रम पुणे-सातारा रोड प्रायव्हेट लिमिटेडतर्फे यंदा राबवण्यात आला. एक पेड माँ के नाम या प्रेरणादायी संकल्पनेतून निसर्गाशी आपले आत्मिक नाते अधोरेखित करत १५०० झाडे लावण्याचा संकल्प कंपनीने केला आहे.५ जून २०२५ रोजी, एनएच ४८ वरील खेड शिवापूर टोल, आनेवाडी टोल, सातारा आणि सुस-पाषाण या चार प्रमुख ठिकाणी एकाचवेळी वृक्षारोपण मोहीम पार पडली. या मोहिमेत कंपनीच्या विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.



या अभियानाचे उद्घाटन टीम लीडर परमेश्वर आरवटकर, आनंद कुलकर्णी, पश्चिम विभाग प्रमुख अमित भाटिया, राकेश कोळी, माधव टेकवडे, दिव्य प्रकाश भेहरा, सुनील सुराणा, अभिजीत गायकवाड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. सर्व मान्यवरांनी पर्यावरण रक्षणाचे सामूहिक उत्तरदायित्व अधोरेखित करत एक पेड माँ के नाम ही संकल्पना केवळ उपक्रम न राहता भावनेचा संदेश असल्याचे स्पष्ट केले.

अमित भाटिया यांच्या दूरदृष्टीतून साकारलेली ही संकल्पना, पर्यावरणप्रेमींसाठी एक नवा आयाम ठरली आहे. आईप्रतीची कृतज्ञता आणि निसर्गाविषयीची संवेदनशीलता यांचे अद्वैत एक पेड माँ के नाम मध्ये प्रभावीपणे उतरवले गेले आहे. झाड लावणे ही केवळ क्रिया नसून, ती भविष्यातील श्वास सुरक्षित करण्याची आणि पर्यावरणाशी नातं दृढ करण्याची प्रक्रिया असल्याचा संदेश या उपक्रमातून मिळतो.

ही मोहीम राबवताना केवळ हरित आवरण वाढवण्यावर भर नव्हता, तर पर्यावरणाविषयी जनजागृती, स्थानिक सहभाग, आणि सामाजिक बांधिलकीही उपकेंद्रस्थानी होती. त्यामुळेच या उपक्रमात सहभागी झालेल्यांमध्ये पर्यावरण रक्षणाबद्दलचे भान अधिक जागृत झाले.एक पेड माँ के नाम ही संकल्पना आज फक्त झाडे लावण्यासाठी नाही, तर आईप्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा नवा मार्ग, आणि भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ व निरोगी पर्यावरण देण्याचा सामाजिक करार ठरत आहे.या उपक्रमामुळे निश्चितच समाजात सकारात्मक बदल घडून येईल आणि पर्यावरणासाठी जबाबदारीची भावना रुजेल. हा उपक्रम इतर कंपन्यांसाठी, संस्थांसाठी आणि नागरिकांसाठीही प्रेरणास्त्रोत ठरेल, यात शंका नाही.

# पिशोर येथे ईद उल अजहा बकरी ईद उत्साहात साजरी; हिंदू-मुस्लिम बांधवांचे एकोप्याचे दर्शन

**पिशोर । जावेद शेख**

पिशोर व परिसरातील करंजखेडा, चिंचोली, लिंबाजी, नाचनवेल, सर्कलमधील नागापूर, सारोळा, पिंपरखेडा, पळशी (बु), हस्ता, वासडी आदी गावांमध्ये दिनांक ७ जून (शनिवार) रोजी ईद उल अजहा बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.पिशोर येथील ईदगाह मैदानात सकाळी ७:३० वाजता मौलाना परवेज खान सिकंदर खान यांच्या नेतृत्वाखाली नमाज़ पठण करण्यात आले. त्यानंतर सकाळी ८:०० वाजता पिशोर जामा मस्जिद येथे मौलाना हफीस खतीब शाह आणि मक्का मस्जिद येथे मौलाना हफीस शाकिर शाह यांच्या नेतृत्वाखाली नमाज़ अदा करण्यात आली. देशाच्या सुख-शांतीसाठी मुस्लिम बांधवांनी विशेष दुआ केली.



ईद उल अजहा हा मुस्लिम समाजाचा एक मोठा सण असून यावेळी पोलीस प्रशासनाने ईदगाह व जामा मस्जिद परिसरात कडक बंदोबस्त ठेवला होता. या प्रसंगी हिंदू-मुस्लिम एकतेचा सजीव संदेश पाहायला मिळाला. अनेक हिंदू बांधव मुस्लिम बांधवांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा देताना दिसले, ज्यामुळे सामाजिक सौहार्दाचे नवे पर्व प्रस्थापित झाले.या कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, सामाजिक कार्यकर्ते राजू मोकासे, माजी सरपंच पि.एम. डाहके, उपसरपंच बाळासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य सुर्यभान दहेतकर, सुनील नवले, गणेश मोकासे, लिपिक रवी आप्पा निकम, योगेश आप्पा मोकासे, सखाराम मोकासे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.हा सण उत्साह, एकोप्य आणि सामाजिक सौहार्दाचा सशक्त संदेश देणारा ठरला.

# धामणगाव रेल्वे स्थानकात दुर्दैवी अपघात-महिलेचे दोन्ही पाय निकामी



**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

धामणगाव रेल्वे स्थानकावर एक दुर्दैवी घटना घडली असून, यामध्ये यशोदा ढोले (वय ४०, रा. दत्तापूर) या महिलेचा पाय घसरून गंभीर अपघात झाला आहे. नागपूरकडे जाणाऱ्या प्रवासी रेल्वे गाडीत चढत असताना त्या गाडीखाली आल्या, परिणामी त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर इजा होऊन ते निकामी झाले आहेत.

घटनेनंतर रेल्वे पोलीस व स्थानिक कर्मचाऱ्यांनी तात्काळ मदत करत त्यांना धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे रेफर करण्यात आले आहे.या घटनेमुळे प्रवाशांमध्ये हळहळ व्यक्त होत असून, रेल्वे स्थानकांवरील सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारी घेण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता

# शेतीला दिलासा,पण वादळी वाऱ्याची भीती कायम; यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**-भारतीय हवामान विभागाने (खचऊ) जाहीर केलेल्या ताज्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात जून महिन्यात मान्सूनपूर्व पावसाची स्थिती सक्रिय होत असून अनेक भागांत पुढील काही दिवसांत विजांसह मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि कोकण विभागात ७ ते १० जूनदरम्यान पावसाचा जोर अधिक राहील.बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात ढगाळ हवामान, गडगडाट वाऱ्यासह पाऊस, आणि काही भागांत विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातही हलक्या सरी सुरू होण्याचा अंदाज आहे. खरीप हंगामाच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस महत्त्वाचा मानला जातो. मात्र, हवामानातील अनिश्चितता लक्षात घेता पेरणीस घाई न करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

राज्य सरकारने आपत्कालीन यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश दिले असून नागरिकांनी हवामान खात्याच्या इशाऱ्यांकडे लक्ष ठेवण्याचे आवाहन केले आहे. मराठवाड्यात आगामी काही दिवसांत पावसाच्या सुस्पष्ट हालचाली पाहायला मिळणार असून हवामान विभागाने जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः बीड, लातूर, हिंगोली, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये पुढील तीन ते चार दिवसांमध्ये विजांसह मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सध्या मान्सून केरळ आणि कर्नाटकमध्ये सक्रीय असून, त्याची प्रगती अपेक्षेपेक्षा थोडी धिम्या गतीने होत आहे. मात्र, दक्षिण-पश्चिम हवेचे प्रमाण वाढत असून त्याचा प्रभाव मराठवाड्यावरही जाणवू लागला आहे. त्यामुळे १० जूननंतर मराठवाड्यात मान्सूनपूर्व सरी अधिक तीव्र होतील, असा अंदाज हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. राज्याच्या हवामानशास्त्र विभागाने मराठवाड्यातील शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. काही ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, यामुळे उभ्या पिकांचे आणि घरांची नुकसानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पावसाच्या आगमनामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाची लाट पसरली आहे. विशेषतः खरीप हंगामाची तयारी करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस वरदान ठरू शकतो. पण हवामानातील अनिश्चिततेमुळे योग्य नियोजन आणि सावधगिरी आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी पेरणीसाठी अजून



काही दिवस प्रतीक्षा करावी, असे कृषी विभागाचे आवाहन आहे.हवामानातील सततच्या बदलांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन धोरण बदलत आहे. कोरडवाहू शेतीवर आधारित मराठवाड्याला पूर्वी निश्चित कालावधीत पाऊस पडत असे. मात्र, आता तो अनियमित झाल्याने पीक चक्र आणि निवड यावर परिणाम झाला आहे. हरभरा, बाजरी, तूर या पारंपरिक पिकांच्या ऐवजी काही शेतकरी सोयाबीन, मका आणि उशिरा येणारी भातशेती करतात, पण ती धोके पत्करणारी बाब आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्तरावरचे हवामान विश्लेषण महत्त्वाचे आहे. केवळ खचऊचा अंदाज पुरेसा नसतो, स्थानिक घटकांचा अभ्यास करून शेतीचे नियोजन आवश्यक असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.विजेच्या गडगडाटात शेतकरी आणि नागरिकांनी झाडांखाली थांबू नये, अशा सूचना प्रशासनाने केल्या आहेत. तसेच, मोबाईल, ट्रॅक्टर व धातूच्या वस्तूंना दूर ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा गारपिटीचा इशाराही हवामान विभागाने दिला आहे. मराठवाड्याच्या दृष्टीने येणाऱ्या काही दिवसांतला पाऊस फारच निर्णायक ठरणार आहे. खरीप हंगामाचे नियोजन, पेरणीचे वेळापत्रक, खतांची उपलब्धता आणि नैसर्गिक आपत्ती यांच्याशी संबंधित अनेक मुद्द्यांवर या पावसाचा परिणाम होईल. प्रशासन आणि शेतकरी यांनी एकत्रित प्रयत्न करून या काळात धोरणात्मक भूमिका घ्यावी लागेल. आगामी दिवसांत जर हवामान खात्याचा अंदाज अचूक ठरला, तर मराठवाड्यात यंदाचा पावसाळा समाधानकारक ठरू शकतो. मात्र, त्यासोबतच वादळी वाऱ्याचा धोका लक्षात घेऊन योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे.

# कोरोना आपल्यासोबतच राहणार : लोकांना पॅनिक होऊन देऊ नका-आरोग्यमंत्र्यांच्या प्रशासनाला सूचना

**मुंबई (वृत्तसंस्था)**
राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गुरुवारी महाराष्ट्रात १०५ नवीन रुग्णांची नोंद झाली असून ३ नवीन बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यासोबतच राज्यातील सक्रिय कोविडबाधित रुग्णांची संख्या ५२६ वर पोहोचली आहे. वाढत्या कोविड रुग्णांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. कोरोना आपल्यासोबतच राहणार, लोकांना पॅनिक होऊ देऊ नका, अशा सूचना आरोग्यमंत्र्यांनी केल्या आहेत.महाराष्ट्रात सर्वाधिक सक्रिय रुग्णसंख्या असलेला जिल्हा पुणे आहे, याठिकाणी ४१ सक्रिय रुग्ण आहेत. त्यानंतर मुंबई (३२), ठाणे (१५), नवी मुंबई (९), सातारा (५) आणि नाशिक, संभाजीनगर आणि नागपूर येथे प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे.

आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी वाढत्या कोरोना रुग्णसंखेवर प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. पुन्हा एकदा कोरोना रुग्णसंखेत वाढ होत असली तरी जनतेने घाबरून जाऊ नये असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या आधी देखील सांगितला आहे, कोरोना वाढला तरी काळजीची गरज नाही. कोरोना आपल्या सोबतच राहणार आहे. आता आपली प्रतिकारशक्ती ही वाढली आहे. रुग्ण वाढत असले तरी केवळ कोरोनामुळे कोणाचाही मृत्यू झालेला नाही. सहव्याधी असलेल्यांचा मृत्यू झाला असल्याचेही आरोग्यमंत्री म्हणाले.येत्या काळात सहव्याधी असलेल्यांची अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. केंद्राच्या सूचनेनुसार आपण काम करत आहोत. लोकांना पॅनिक होऊ देऊ नका. फक्त योग्य पद्धतीने काळजी घ्या. सहव्याधी असलेल्या रुग्णांची काळजी घ्यावी, अशा सूचना आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी केल्या आहेत.कोरोना रुग्णांच्या या वाढीदरम्यान महाराष्ट्रात आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये मे महिन्यात १२ आणि जूनमध्ये ५ मृत्यू झाले. मृतांपैकी १६ जणांना पूर्वीपासूनच आजार होते आणि एकाला दुसरा आजार होता. मुंबईत सर्वाधिक ४ मृत्यू झाले आहेत, त्यानंतर नवी मुंबई आणि कल्याण-डोंबिवलीत प्रत्येकी ३, नागपूर आणि कोल्हापूर प्रत्येकी २ आणि ठाणे, सातारा आणि सांगली येथे प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे.गुरुवारपर्यंत, महाराष्ट्रात ५२६ लोक सक्रियपणे संक्रमित आहेत, तर ५२१ रुग्ण बरे झाले आहेत. जानेवारीपासून राज्यात एकूण १३,७०७ कोविड-१९ चाचण्या घेण्यात आल्या आहेत.देशभरातही कोरोनाच्या परिस्थितीतही वाढ झाली आहे. ४ जूनपर्यंत, भारतात ४ हजार ३०२ सक्रिय कोविड रुग्णांची नोंद झाली. २४ तासांत ८६४ रुग्णांची वाढ झाली. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, यापैकी बहुतेक संसर्ग सौम्य आहेत आणि घरीच त्यांचे उपचार केले जात आहेत. या वर्षी १ जानेवारीपासून, राष्ट्रीय स्तरावर कोविडशी संबंधित ४४ मृत्यू नोंदवले गेले आहेत, ज्यामध्ये प्रामुख्याने सह-रोग असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे.भारतात एक नवीन कोविड-१९ उपप्रकार, छइ.१.८.१, आढळून आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने (थकज) त्याच्या अद्याप अस्पष्ट साथीच्या प्रभावामुळे त्याला 'निरीक्षणाखालील प्रकार' म्हणून वर्गीकृत केले आहे.



# रायगडावर केवळ पोषक गोष्टीच राहतील संभाजीराजे छत्रपती यांची ग्वाही

**रायगड (वृत्तसंस्था)**-माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी शुक्रवारी शिवराज्याभिषेक दिनाच्या दिवशी पुन्हा एकदा रायगडावर रायगडाला पोषक असणाऱ्या गोष्टीच राहतील असे ठणकावून सांगितले आहे. रायगडावर रायगडाला पोषक असणाऱ्या गोष्टीच राहतील. हा माझा शब्द आहे. पण अतिक्रमण काढत असताना माझे संरक्षण सुद्धा येथील धनगर समाजाला असणार आहे, असे ते म्हणालेत.रायगडावर आज तारखेनुसार शिवराज्याभिषेकाचा सोहळा साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने संभाजीराजे छत्रपती यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना दुग्धाभिषेक केला. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी रायगडावर रायगडाला पोषक असणाऱ्या गोष्टीच राहतील असा पुनरुच्चार केला. आजचा शिवराज्याभिषेक सोहळा आनंदाचा असून सुवर्णक्षण आहे. त्यामुळे रायगडावर रायगडाला पोषक आहेत त्याच गोष्टी राहणार हा माझा शब्द आहे. पण हे अतिक्रमण काढत असताना माझे संरक्षण येथील धनगर समाजाला असणार आहे.

ज्या ठिकाणी हजार-दोन हजार लोक यायचे, तिथे आज लाखो लोक येत आहेत. एवढा शिस्तभक्त शिवभक्त... कोणताही कायदा हातात न घेणारा हा शिवभक्त आहे. मला आयजी व एसपीने ही शिस्त कशी निर्माण होते? असा प्रश्न दिला. त्यावर मी त्यांना हे शिवभक्तांवर असणारे संस्कार आहेत, असे ते म्हणाले.किल्ले रायगडावरील होळीच्या माळावर सुरू असलेल्या मर्दानी खेळात काही शिवभक्त दांडपट्टा चालवत होते. त्यावेळी स्वतः संभाजी राजे आपल्या पत्नी संयोगिता राजे व सुपुत्र युवराज शहाजी राजे यांच्यासोबत तिथे गेले. यावेळी त्यांच्याभोवती महिलांनी दांडपट्टा चालवता. त्यावेळी हे तिघेही निडरपणे उभे होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे संभाजीराजे छत्रपती यांनी रायगडावरील वाघ्या कुत्र्याची हटवण्याची मागणी केली आहे. या श्वानाने शिवाजी महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या चितेत उडी घेऊन मृत्युला कवटाळल्याची आख्यायिका आहे. पण संभाजीराजे यांनी इतिहासात अशा कोणत्याही घटनेचा उल्लेख नसल्याचा दावा केला आहे. ते



यासंबंधी आपली ठाम भूमिका मांडताना म्हणाले होते, हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे. सदर वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख अथवा संदर्भ मिळत नाही.भारतीय पुरातत्व विभागाने देखील सदर समाधी संरचना व वाघ्या कुत्र्याचे ऐतिहासिक महत्त्व यांबाबत त्यांच्याकडे कोणतीही ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नसल्याची स्पष्टोक्ती दिलेली आहे.समस्त भारतवासीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रद्धेची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा आहे.कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व नसलेली सदरील वाघ्या कुत्रा समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ३१ मे २०२५ अखेरीपर्यंत सदरील अतिक्रमण श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळावरून व दुर्गराज रायगड वरून कायमस्वरूपी हटविण्यात यावे, याकरिता मुख्यमंत्री महोदयांकडे पत्र लिहून मागणी केली.भारतीय पुरातत्व विभागाच्या धोरणानुसार १०० वर्षांहून अधिक पुरातन असलेली संरचना संरक्षित स्मारक म्हणून गणली जाते. त्यामुळे वाघ्या कुत्रा समाधी संरचनेस १०० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच विहित कालमर्यादेत ही संरचना हटविणे अत्यावश्यक आहे, असे ते म्हणाले होते.

# मुरादपूर उपसा सिंचन योजनेचे लोकार्पण ४६५ एकर जमिनीला मिळणार बारमाही पाणी, दररोज १०८० युनिट वीजनिर्मिती



**नागपूर (वृत्तसंस्था)**-नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात वडगाव जलाशयावर तरंगत्या सोलर पॅनलवर चालणाऱ्या मुरादपूर उपसा सिंचन योजनेचे लोकार्पण करण्यात आले. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन झाले.या प्रकल्पामुळे ४६५ एकर शेतजमिनीला वडगाव जलाशयातून बारमाही पाणी मिळणार आहे. प्रकल्पात २७० केव्हीए क्षमतेचे तरंगते सौर पॅनल बसवण्यात आले आहेत. हे पॅनल दररोज १०८० युनिट वीज निर्माण करतील. या विजेच्या सहाय्याने प्रकल्पावरील सर्व पंप आणि उपकरणे विनाशुल्क चालवली जातील.गडकरी यांनी शेतकऱ्यांना फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापन करण्याचे आवाहन केले. त्यांनी एकत्रितपणे ट्रॅक्टर वापरून वखरणी करण्याचा आणि ड्रोनद्वारे फवारणी करण्याचा सल्ला दिला. यामुळे एकरी ५ ते ६ हजार रुपयांची बचत होईल.

कार्यक्रमात खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संजय मेश्राम, माजी आमदार सुधीर पारवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. गडकरी यांनी १०० कोटी रुपयांच्या स्मार्ट व्हिलेज प्रकल्पाचीही घोषणा केली. या प्रकल्पात १००० कुटुंबांना ४५० चौरस फुटाची घरे, मोफत पाणी आणि वीज, खेळाचे मैदान आणि उद्यान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# सांगोल्यात जलसंपदा विभागाचीक्षेत्रीयविभागीय कार्यालये होणार-चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला । प्रतिनिधी**
टेंभू, म्हैसाळ, नीरा, स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना या सिंचन प्रकल्पा अंतर्गत सांगोला तालुक्यातील ४४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असून सुमारे १६०० हेक्टर वरील सिंचन प्रकल्प प्रस्तावित असून, सदर प्रस्तावित प्रकल्पाचे भूमिपूजन होऊन, प्रकल्प कार्यन्वित करण्यात आले आहेत. प्रशासकीय तसेचक्षेत्रीयकामासाठी लाभधारकांना सुमारे १०० किमी प्रवास करून हेलपाटे मारावे लागतात. त्यासाठी सर्व सिंचन प्रकल्पाचीक्षेत्रीयकार्यालये व विभागीय कार्यालये सांगोल्यात व्हावीत अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या मागणीला यश आले असून सांगोल्यात लवकरच जलसंपदा विभागाची क्षेत्रीय कार्यालये होणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

वीर धरणाअंतर्गत नीरा उजव्या कालव्याचे सांगोला शाखा कालवा क्रमांक ४ व ५ द्वारे तालुक्यातील सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. परंतु सदर प्रकल्पाचे विभागीयकार्यालयनीरा उजवा कालवा विभाग फलटण ता. फलटण जिल्हा सातारा येथे आहे. म्हैशाळ उपसा सिंचन योजने अंतर्गत तालुक्यातील सुमारे ४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे व ०.८ टीएमसी इतके पाणी उपलब्ध आहे. सदर योजनेचे विभागीयकार्यालयम्हैशाळ पंपगृह विभाग क्रमांक २ सांगली ता. सांगली जिल्हा सांगली येथे आहे. टेंभू उपसा सिंचन योजने अंतर्गत तालुक्यातील सुमारे २० हजार हेक्टर सिंचनाखाली आहे व ३ हजार हेक्टर क्षेत्रावर नव्याने सिंचन करण्याचे प्रस्तावित आहे. या योजने अंतर्गत तालुक्यात ४.५ टीएमसी पाणी उपलब्ध असून सदरच्या योजनेचे विभागीयकार्यालयटेंभू उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग ओगलेवाडी ता. कराड जिल्हा सातारा येथे आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना या अंतर्गत तालुक्यातील १३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचन करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेचे विभागीयकार्यालयउजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा ता. मंगळवेढा जिल्हा सोलापूर येथे आहे. याशिवाय तालुक्यात माण नदीवरील १४ को.प.बंधारे, कोरडा नदीवरील २ को.प. बंधारे असून १४ लघु व एक मध्यम पाटबंधारे प्रकल्प आहेत. सदर प्रकल्पावरील सिंचन क्षेत्र सुमारे १० हजार हेक्टर इतके आहे. परंतु सदर प्रकल्पाचेक्षेत्रीयव प्रशासकीयकार्यालयभीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर ता. पंढरपूर जिल्हा सोलापूर येथे आहे.

वरील सर्व सिंचन प्रकल्पा अंतर्गत तालुक्यातही सुमारे ४४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असून सुमारे १६०० हेक्टर वरील सिंचन प्रकल्प प्रस्तावित असून, सदर प्रस्तावित प्रकल्पाची भूमिपूजन होऊन, प्रकल्प कार्यन्वित करण्यात आलेले आहेत. या सर्व बाबीचा विचार करता प्रशासकीय तसेचक्षेत्रीयकामाकरिता तसेच अन्य बाबी करीत इतक्या मोठ्या क्षेत्रातील लाभधारकांना संबंधित काम करीत सुमारे १०० किमी प्रवास करून हेलपाटे मारावे लागतात. त्या करीत उपरोक्तच्या सिंचन प्रकल्पाची क्षेत्रीयकार्यालये व विभागीयकार्यालये सांगोला व्हावीत अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या मागणीची दखल घेतली असून सिंचन प्रकल्पाची क्षेत्रीयकार्यालये व विभागीयकार्यालये सांगोल्यात होणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

# सामाजिक न्याय विभागाची पुन्हा कोंडी लाडकी बहीण योजनेसाठी पुन्हा निधी वळवला

**मुंबई (वृत्तसंस्था)**-लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारची चांगलीच दमछाक होताना दिसतेय. या योजनेसाठी लागणारा निधी भागवण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी पुन्हा एकदा वळवण्यात आला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागातील अनुसूचित जाती घटकांसाठी मंजूर केलेल्या ४१०.३० कोटी रुपयांचा निधी वळवण्यात आला आहे. विशेष म्हणजे याआधीही हाच निधी एकदा वळवण्यात आलेला होता. म्हणजेच आतापर्यंत सामाजिक न्याय विभागाचा ८२० कोटी ६० लाख रुपयांचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वापरण्यात आला आहे.

आदिवासी विकास विभागाकडूनही तब्बल ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी तीन वेळा वळवण्यात आला असून, एकूण १,००७ कोटी रुपयांचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वापरला गेला आहे. यामुळे दोन्ही विभागांकडून एकत्रितपणे १,८२७ कोटी ७० लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.या पूर्वीही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी यावरून अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर थेट टीका केली होती. आता पुन्हा एकदा त्यांच्या खात्यातील निधी वळवल्याने राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा हवा मिळण्याची शक्यता आहे.




यावर्षी सामाजिक न्याय विभागासाठी एकूण २९ हजार ९७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी जवळपास ५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण आणि तत्सम योजनांसाठी ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे विभागाच्या मुख्य योजनांसाठी उरलेले २२ हजार ६५८ कोटी रुपयेच सध्यातरी उपलब्ध आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या मूळ योजनांमध्ये सुमारे ७,३१४ कोटी रुपयांची तूट जाणवू शकते, असा अंदाज व्यक्त केला जातो. लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाकडून एकूण ३,९६० कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यातीलच काही निधी सध्या वळवण्यात आला असून, मे महिन्याचा हप्ता त्यातूनच वितरित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# सांगोला नगरपरिषदेतर्फे वृक्षारोपण रोपांच्या संवर्धनाची घेण्यात शपथ



**सांगोला (वृत्तसंस्था)**-जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सांगोला नगरपरिषदेमार्फत तालुका क्रीडा संकुल येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सांगोला विधानसभा सदस्य मा. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख व सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळेस मा. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी वृक्षारोपण कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व लावण्यात आलेल्या रोपांची जबाबदारीने जोपासना करावी असे सुचित केले.या वृक्षारोपण कार्यक्रमास फॅबटेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी सांगोला नगरपरिषदेचे अधिकारी सचिन पाडे, रोहित गाडे , विनोद सर्वगोड , प्रियंका पाटील, अस्मिुता निकम ,महेश रजपूत व इतर कर्मचारी वर्ग यांनाही वृक्षारोपण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरिफ मुलाणी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha  Rakhandar Daily Newspaper  Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .